वाचा :- 1) महाराष्ट्र शासन,शासन निर्णय क्र.ग्रामविकास विभाग एटीपी/2587/सी.आर 817/13 दि.05/02/1990
2) महाराष्ट्र शासन,शासन निर्णय क्र.ग्रामविकास विभाग एटीपी/2590/सी.आर 583/13 दि.06/02/1990
3) महाराष्ट्र शासन,शासन निर्णय क्र.ग्रामविकास विभाग एटीपी/1089/सी.आर 605/17 दि.06/02/1990
4) श्रीमती.द्रुस्सीला डॅनियल वाघमारे,से.नि.आरोग्य सेविका (म) यांचे रजा आवेदन पत्र दि. 23/08/2018
5) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक -24/ 9 /2018

---

**आदेश**

**नाशिक जिल्हा परिषद नाशिक**
**आरोग्य विभाग**
जा.क्र.आरोग्य/आस्था-5/ 73/ /2018
दिनांक -24 / 9 /2018

श्रीमती.द्रुस्सीला डॅनियल वाघमारे, से.नि.आरोग्य सेविका (महिला), प्रा.आ.केंद्र.अंबोली, ता.त्र्यंबक यांना दिनांक 21/ 02/1986 रोजी आरोग्य सेविका (महिला) या पदावर अकरा (११) महिण्याकरीता पं.स.इगतपूरी येथे नियुक्ती दिलेली होती. त्यांनतर एक दिवसांचा तांत्रीक खंड देवुन वेळोवेळी फेरनियुक्ती दिलेली आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग,शासन निर्णय दिनांक 05/02/1990 नुसार दिनांक 18/06/1983 ते दिनांक 17/02/1988 या कालावधीत शासन आदेशानुसार जिल्हा सेवेतील पदावर तात्पुरत्या नेमणूका दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या नेमणूका नियमित करणेची तरतूद केलेली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक 05/02/1990 नुसार खंड देण्यात आलेला कालावधी हा देय व अनुदेय रजा मंजूर करुन विनियमित करण्याची तरतूद केलेली आहे.

श्रीम.वाघमारे,आरोग्य सेविका हया दिनांक 30/06/2017 रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेल्या आहेत. मात्र त्यांचे सेवापुस्तक सेवानिवृत्ती वेतन प्रकरण मंजूरी करीता तपासले असता त्यात आरोग्य सेविका (महिला) या पदावर प्रथम नियुक्तीचा दिनांक 21/02/1986 असुन त्यांना त्यांच्या सेवाकालावधी मध्ये दिनांक 12/01/1987 ,दिनांक 12/12/1987 , व दिनांक 13/12/1987 असा एकुण-03 दिवसांचा सेवाखंड दिलेला असून तो नियमित केलेला नाही.

शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार या आदेशान्वये श्रीम.वाघमारे, यांचा दिनांक 12/01/1987 ,दिनांक 12/12/1987 , व दिनांक 13/12/1987 असा एकुण-03 दिवसांचा सेवाखंड हा देय-अनुदेय (अर्जित) रजा मंजूर करण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद श्रीमती. द्रुस्सीला डॅनियल वाघमारे,से.नि.आरोग्य सेविका (महिला), ता.त्र्यंबक यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

**प्रति:-1) श्रीमती.द्रुस्सीला डॅनियल वाघमारे,से.नि.आरोग्य सेविका (महिला), प्रा.आ.केंद्र.अंबोली,ता.त्र्यंबक**
**प्रत:- 2) तालुका वैद्यकीय अधिकारी, पंचायत समिती,त्र्यंबक**

प्रतीलिपी:- माहितीस्तव रवाना.
1) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, त्र्यंबक
2) वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र.अंबोली, ता.त्र्यंबक
3) मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
4) मध्यवर्ती माहिती तंत्र कक्ष (आयटी सेल) सामान्य प्रशासन विभाग, जि.प.नाशिक